# कोरोना साथीचे जागतिक परिणाम

**प्रा. ए. बी. मोहिते**

सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र म. ह. शिंदे महाविद्यालय तिसंगी,
ता.गगनबावडा, जि.कोल्हापूर.

........................................................................................................................................

**प्रास्ताविक**

आज संपूर्ण जगात कोरोना किंवा कोविड–१९ या विषाणूच्या साथीने थैमान घातले आहे. गेल्या चार महिन्यात या रोगाचा विळखा वाढत आहे. जागतिक आरोग्य संघटनेने ३० जानेवारी २०२० रोजी कोरोना साथीला जागतिक महामारी म्हणून घोषित केले. ३० डिसेंबर २०१९ रोजी चीनमधील वुहान शहरात एका रूग्णामध्ये कोरोना विषाणू प्रथम आढळून आला. हा विषाणू अत्यंत संसर्गजन्य असल्याने पूर्व आशियातील तैवान, दक्षिण कोरिया, सिंगापूर, थायलंड, जपान या देशांनी कोरोनाचा प्रसार रोखण्यासाठी कोरोना चाचणी, डॉक्टर व रूग्णालय कर्मचाऱ्यांना संरक्षक पोषाख, सामाजिक अंतर, हातांची स्वच्छता इत्यादी गोष्टींवर भर दिल्याने या देशांमध्ये कोरोनाचा प्रसार रोखण्यात यश आले आहे. याउलट इटली, फ्रान्स, स्पेन, जर्मनी, ब्रिटन या देशांनी चाचणी व इतर उपाययोजना करण्यास विलंब केला. अमेरिकेने या विषाणू संसर्गाकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले. परिणामी सर्वात जास्त हानी अमेरिकेची झाली आहे. युरोप–अमेरिकेने आपल्या नागरिकांच्या जिवितापेक्षा आर्थिक हिताला प्राधान्य दिलेले दिसून येते.

महात्मा गांधीजींनी ‘हिंद स्वराज्य’ या पुस्तिकेत हिंदुस्थानची दशा–२, रेल्वे, या प्रकरणात लिहिले आहे की, रेल्वेमुळे प्लेगचा देखील फैलाव झाला आहे. रेल्वे नसेल तर फार थोडी माणसे एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जातील आणि त्यामुळे सांसर्गिक रोग देशभर पसरण्याचा धोका राहणार नाही. आज २१ व्या शतकात तंत्रवैज्ञानिक प्रगतीमुळे प्रवासी वाहतुक व्यवस्थेमध्ये प्रचंड वाढ झाली आहे. उद्योग, व्यवसाय, पर्यटनासाठी वाहतूक सुविधा ही महत्त्वाची पायाभूत सुविधा मानली जाते. परंतु आज ११० वर्षांनी जगातील कोरोनाबाधित देशांना रेल्वेच नव्हे तर जल, हवाई व रस्ते वाहतुकही थांबविण्याची वेळ आली आहे.

प्रस्तुत शोधनिबंधात कोरोना साथीचे आंतरराष्ट्रीय स्तरावर राजकीय, सामाजिक, आर्थिक, तंत्रज्ञान व पर्यावरणावर होणाऱ्या परिणामांचा थोडक्यात आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे. शोधनिबंधासाठी वर्णनात्मक आणि विश्लेषण पध्दतीचा अवलंब करण्यात आला आहे. शोधनिबंध लिहिताना प्रामुख्याने दुय्यम साधनांचा वापर केला आहे.

**१. राजकीय परिणाम**

**अ) टाळेबंदी**

कोरोना साथीमुळे संपूर्ण जगात अभूतपूर्व परिस्थिती निर्माण झाली आहे. जगातील विविध देशातील राजकीय व्यवस्थांना मोठा धक्का बसला आहे. अनेक देशांना टाळेबंदी करावी लागली. काही देशांनी राष्ट्रीय आणिबाणीची घोषणा केली. उद्योग, व्यवसाय, रोजगार ठप्प झाले आहेत. त्यामुळे अनेक देशात आर्थिक संकट निर्माण झाले आहे.

**ब) केंद्रसरकारच्या अधिकारात वाढ**

टाळेबंदीमुळे केंद्रीय नेतृत्वाकडे अधिकारांचे मोठ्या प्रमाणात केंद्रीकरण झालेले दिसून येत आहे. उदा. अमेरिकन अध्यक्षांनी आपल्या अधिकारात ‘जिलाद सायन्सेस’ या औषधनिर्माण कंपनीला कोरोनावरील ‘रेमडेसिवीर’ या औषधाच्या उत्पादनास परवानगी दिली आहे. भारतात टाळेबंदीनंतर आपत्ती व्यवस्थापन कायदा आणि साथरोग नियंत्रण कायद्याने केंद्र सरकारच्या ठिकाणी अधिकारांचे केंद्रीकरण झालेले दिसून येते. टाळेबंदीचा निर्णय घटकराज्यांशी चर्चा न करता घेण्यात आला आहे. आरोग्य, स्वच्छता हे घटकराज्यांचे अधिकार केंद्राने स्वत:कडे घेतले आहेत. शिवाय आर्थिकदृष्ट्या घटकराज्ये केंद्रसरकारवर अवलंबून असल्याने ती उघड भूमिका

घेताना दिसत नाहीत. त्यामुळे टाळेबंदी काळात घटकराज्यांच्या अधिकारांचा संकोच झालेला दिसून येतो.

**क) रोजगारनिर्मिती**

टाळेबंदीमुळे अनेक देशातील उद्योग व्यवसाय बंद झाल्यामुळे बेकारीची समस्या निर्माण झाली आहे. त्यामुळे येत्या काळामध्ये बेरोजगार लोकांचा असंतोष नियंत्रित करण्याची मोठी समस्या राजकीय व्यवस्थांसमोर उभी राहणार आहे. त्यासाठी राज्यकर्त्यांना रोजगार निर्मितीसाठी धोरणांची आखणी करून प्रभावीपणे अंमलबजावणी करावी लागणार आहे.

**ड) चीनविषयी संशय**

चीनने कोरोना संसर्गाची माहिती लपविली असा आरोप अमिरेकेने केला आहे. तसेच चीनला डब्ल्यू.एच.ओ. पाठीशी घालत आहे, असाही आरोप केला आहे. अमेरिकेने डब्ल्यू.एच. ओ.चा निधी थांबवला आहे. चीनने जैविक अस्त्राचा वापर केल्याचा आरोप अमेरिकेने केला आहे. चीनने अजूनही आपली भूमिका स्पष्ट केलेली नाही. त्यामुळे चीनविषयी संशयाचे वातावरण निर्माण झाले आहे. याबरोबरच अनेक पश्चिमी देशांनी चीनमध्ये गुंतवणूक केली आहे. तसेच अनेक देश चीनमधील वस्तुंच्यावर अवलंबून असल्याने अशा देशांना मोठ्या प्रमाणात आर्थिक फटका बसला आहे.

**इ) कोरोना आणि भारत**

भारताने कोरोना साथ नियंत्रणात ठेवण्यासाठी २५ मार्च ते १४ एप्रिल २०२०, १५ एप्रिल ते ०३ मे २०२० आणि ०४ मे ते १७ मे २०२० अशी तीन टप्प्यात टाळेबंदी लागू केली आहे. भारताने या साथीवर प्रभावी नियंत्रण मिळविल्यास व देशाची अर्थव्यवस्था वेळेत पूर्वपदावर आणल्यास आंतरराष्ट्रीय क्षेत्रात चीनला पर्याय ठरू शकतो.

**ई) आरोग्याच्या प्रश्नाला महत्व**

आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर आजपर्यंत शस्त्रस्पर्धा, व्यापारी करार, अण्वस्त्र चाचण्या, क्षेपणास्त्र चाचण्या, लष्करी गट, दहशतवाद, तंत्रज्ञान इ. विषयावर विचारविनिमय होत असे. परंतु कोरोना साथीमुळे आंतराष्ट्रीय व्यासपीठावरून आजपर्यंत दुर्लक्षिला गेलेला 'आरोग्य व स्वच्छता' या विषयावर चर्चा होवून सर्व देश त्या दिशेने प्रयत्न करताना दिसत आहेत. त्यामुळे जागतिक पातळीवर आरोग्याच्या प्रश्नाला महत्व प्राप्त झाले आहे.

**२. आर्थिक परिणाम**

**अ) जागतिकीकरणाला धक्का**

कोरोना साथीचा सर्वात जास्त परिणाम जगाच्या अर्थव्यवस्थेवर झाला आहे. प्रत्येक देशाची अर्थव्यवस्था टाळेबंदीमुळे संकटात सापडली आहे. त्यामुळे जागतिकीकरणाच्या मूलभूत तत्वालाच धक्का बसला आहे. स्वस्त मजूर, पर्यावरण कायद्यात सूट, करांमध्ये सूट मिळाल्यामुळे अनेक बहुराष्ट्रीय कंपन्यांनी आपले उत्पादन प्रकल्प चीनमध्ये आणले. तसेच ३३ देशांसाठी चीन सर्वात मोठा आयातदार व ६६ देशांसाठी सर्वात मोठा निर्यातदार देश आहे. त्यामुळे विकसित, विकसनशील व अविकसित देशांचे एकाच देशावरील अवलंबित्व वाढले होते. परिणामी चीनमध्ये टाळेबंदी केल्यानंतर या सर्व देशांना व गुंतवणूकदार कंपन्यांना मोठ्या प्रमाणात आर्थिक फटका बसला आहे. त्यानंतर जगातील अनेक देशांनीही टाळेबंदी लागू केल्यामुळे भारतासह अनेक देश आर्थिक संकटात सापडले आहेत. त्यामुळे भविष्यात वस्तू व सेवांसाठी एकाच देशावर अवलंबून राहणे धोक्याचे ठरू शकते.

**ब) खनिजतेलाचा पेच**

जगभर लॉकडावून केल्यामुळे उद्योग व्यवसायाबरोबरच विमानसेवा, जहाज वाहतूक, रेल्वेसेवा व रस्ते वाहतूक बंद झाल्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत तेलाची मागणी एकदम घटली. त्याचा परिणाम तेल उत्पादक देश आणि कंपन्यांना बसला आहे. एप्रिलच्या तिसऱ्या आठवड्यात अमेरिकेच्या 'टेक्सास इंटरमिजिएट' या खनिज तेलाचा भाव उणे ३७.६३

डॉलर प्रति बॅरल इतका घसरला. ओपेक देशांच्या 'ब्रेंट' तेलाचे भाव २० डॉलर प्रति बॅरल पर्यंत घसरले आहेत. जगाचे अर्थचक्र थांबल्याचे हे द्योतक आहे.

**क) जागतिक मंदी व बेरोजगारी**

लॉकडावूनमुळे जागतिक स्तरावर मंदीची लाट येणार आहे. उद्योग, व्यवसाय, रोजगार बंद पडल्याने कोट्यावधी लोक बेरोजगार होण्याची भिती व्यक्त होत आहे. अशा बेरोजगार लोकांना जगवणे व त्यांच्यातील असंतोष नियंत्रित करून अर्थव्यवस्था सुरळीत करण्यासाठी नियोजनपूर्वक प्रयत्न करावे लागतील. या काळात अविकसित व विकसनशील देशातील विकासकामे थांबवावी लागतील.

**३. सामाजिक परिणाम**

**अ) प्रतिकूल परिणाम**

कोरोना साथीचा परिणाम समाजव्यवस्थेवरही झाला आहे. टाळेबंदीमुळे उद्योग व्यवसाय बंद झाल्याने कामगार व मजूरांच्यात बेकारीची समस्या निर्माण झाली आहे. अचानक टाळेबंदी लागू केल्याने कामगार, मजूर, पर्यटक, विद्यार्थी अडकून पडले. त्यांच्या आरोग्य व निर्वाहाचा प्रश्न बिकट झाला आहे. वाहतूक सुविधा बंद झाल्याने अनेक लोक पायी स्थलांतर करत आहेत. टाळेबंदीमुळे लोकांच्यात मानसिक तणाव निर्माण झाला आहे. घरगुती हिंसाचारात वाढ झाली आहे. युरोप, अमेरिकेत घटस्फोटाचे प्रमाण वाढले आहे. सायबर क्राईममध्ये वाढ झाली आहे. इत्यादी प्रतिकूल परिणाम होत आहेत.

**ब) अनुकूल परिणाम**

याबरोबरच चोरी, मारामारी, खून, दरोडे इ. गुन्हे टाळेबंदी काळात कमी झालेले दिसून आले. सार्वजनिक आरोग्य व स्वच्छतेविषयी नागरिकांच्यात जागरूकता निर्माण झाली आहे. त्यासाठी समाजमाध्यमे, वृत्तपत्रे, दूरदर्शन, रेडिओ यांनी चांगली कामगिरी केली आहे. सामाजिक अंतर, मुखपट्टी लावणे, वारंवार हातांची स्वच्छता इ.मुळे आरोग्यभान वाढले आहे. ऑनलाईन बैठका, परिषदा, शिक्षण, खरेदी वाढली आहे. 'वर्क फ्रॉम होम' सारखी नवी संकल्पना प्रत्यक्षात आलेली दिसते. त्यातून एक नवी कार्यसंस्कृती आकार घेत आहे. कोरोनाला तोंड देण्यासाठी स्वयंसेवी संस्थांनी जगभर चांगली कामगिरी केली आहे. अशाप्रकारे कोरोना साथीमुळे काही अनुकूल सामाजिक बदल होत आहेत.

**४. तंत्रज्ञानाचा वापर**

कोरोना टाळेबंदीच्या काळात डिजीटल तंत्रज्ञानाचा वापर मोठ्या प्रमाणात वाढलेला दिसून येतो.

**अ) वर्क फ्रॉम होम**

कोरोना टाळेबंदीमुळे नोकर, व्यावसायिकांना आपल्या घरीच रहावे लागले आहे. या काळात कार्यालयात न जाता घरातूनच काम करण्याची 'वर्क फ्रॉम होम' ही नवी संकल्पना निर्माण झाली आहे. माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील कंपन्यांनी आपल्या कर्मचाऱ्यांना अशा सूचना दिल्या आहेत. शिक्षणक्षेत्रातही या पध्दतीचा अवलंब करण्यास सुरूवात झाली आहे.

**ब) बॅकींग आणि व्यापार**

टाळेबंदीमुळे ऑनलाईन बॅकींग व्यवहारामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. तसेच ई—कॉमर्स कंपन्यांच्या मागणीत व व्यवहारात वाढ झाली आहे. या व्यवहारात व्यापारी व शेतकरीही सहभागी होत आहेत. उदा. महाराष्ट्रात सांगलीमध्ये हळदीच्या ऑनलाईन सौद्यामध्ये २०७ शेतकरी, ३५० खरेदीदार व ८० अडत व्यापाऱ्यांनी भाग घेतला होता. त्यामुळे जगातील मानवी समाजाची वाटचाल तंत्रस्नेही होत असल्याचे दिसून येते.

**क) राजकीय डिजीटलायझेशन**

राजकीय क्षेत्रात डिजीटल बोर्ड, सोशल मिडिया, दूरचित्र वाहिन्यांचा वापर केला जात असतो. परंतु टाळेबंदीनंतर सर्व प्रकारची प्रवास साधने बंद झाल्यामुळे राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय बैठका, चर्चासत्रे, परिषदा व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे घेतल्या जात आहेत. उदा. ०४

मे २०२० रोजी अलिप्त राष्ट्र संघटनेची परिषद व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे घेण्यात आली. भारताचे पंतप्रधान याद्वारे परिषदेत सहभागी झाले होते. तसेच भारतात घटकराज्यांच्या मुख्यमंत्र्यांसह पंतप्रधानांची बैठक याच पध्दतीने घेण्यात आल्या आहेत. दूरचित्रवाणीवर विद्यापीठांमध्ये चर्चासत्रांचे आयोजनही केले जात आहे. याबरोबरच डिजीटल समाज माध्यमातून कोरोना संसर्गाविषयी मोठ्या प्रमाणात जनजागृती घडवून आणली जात आहे. त्यामुळे जगाचे वेगाने डिजीटलायझेशन होताना दिसते.

**५. पर्यावरणावरील परिणाम**

कोरोना टाळेबंदी काळात पर्यावरणावर मात्र अनुकूल परिणाम झाला आहे. सर्व प्रकारचे प्रदूषण कमी झाल्यामुळे प्राणी, पक्षी, वनस्पती मोकळा श्वास घेत आहेत. त्यांचा संचार वाढला आहे. हवा प्रदूषणामुळे भारतात वर्षाला १२ लाख लोकांचा मृत्यू होतो. टाळेबंदीमुळे हवेचा दर्जा सुधारला आहे. वातावरणात ओझोन थराला पडलेले छिद्र बुजले आहे. नोकरी, व्यवसाय, रोजगारासाठी शहरात गेलेले लोक गावाकडे परत येत आहेत. त्यामुळे शेती व खेड्यातील शाश्वत स्वयंपूर्ण जीवनाचे महत्व अधोरेखित झाले आहे.

**सारांश**

कोरोना साथीमुळे उद्‌भवलेल्या परिस्थितीमुळे जगावर प्रभुत्व गाजवणारी जागतिक भांडवलशाही कोलमडून पडली आहे. तिचा कमकुवतपणा उघड झाला आहे. नागरिकांचा जीव वाचवण्यापेक्षा भांडवलशाही वाचवण्याचा प्रयत्न करणारे युरोपीय देश व अमेरिका कोरोना संसर्गामुळे हतबल झाले आहेत. भांडवलशाहीला समर्थन देणाऱ्या राज्यव्यवस्था कोरोनाचे संकट पेलू शकल्या नाहीत हे वास्तव जगासमोर आले आहे. अमेरिकेत आतापर्यंत ७५ हजार लोकांचे बळी गेले आहेत व १२ लाखावर लोकांना संसर्ग झाला आहे व अजूनही वाढत आहे. तरीही अमेरिकन अध्यक्ष ट्रम्प घटकराज्यांना टाळेबंदी उठवून उद्योग—व्यवसाय सुरू करण्याचा सल्ला देत आहेत. यापुढे प्रत्येक देशाला आपली सार्वजनिक आरोग्य व्यवस्था सक्षम करावी लागेल.

**निष्कर्ष**

१. संघराज्य व्यवस्थेत राजकीय सत्तेचे केंद्रीकरण झाले आहे.
२. आंतरराष्ट्रीय राजकारणातील व आर्थिक व्यवहारातील चीनचे महत्व कमी होत जाण्याची शक्यता आहे.
३. यापुढे राजकीय व्यासपीठावर आरोग्याच्या प्रश्नाला महत्व प्राप्त झाले आहे.
४. जागतिकीकरण, भांडवलशाही व्यवस्था व त्याचे समर्थन करणाऱ्या जागतिक व्यापार संघटना यांचे महत्व कमी होत आहे.
५. भांडवलशाहीबरोबरच इतर मिश्र अर्थव्यवस्थांचा विचार जगातील राजकीय व्यवस्थांना करावा लागेल.
६. आर्थिक मंदी व बेरोजगारीमुळे सत्ताधाऱ्यांच्या विरोधात असंतोष वाढू शकतो.
७. भारताने कोरोना साथीचे वेळीच नियंत्रण केल्यास परकीय गुंतवणुकीसाठी पर्याय म्हणून भारताचा विचार होवू शकतो.
८. कोरोना काळात नवीन कार्यसंस्कृती व जीवनपध्दती आकाराला येत आहे.
९. कोरोना काळात मानवी जीवन तंत्रज्ञानस्नेही झाले आहे.
१०. कोरोना टाळेबंदीकाळात पर्यावरणावर अनुकूल परिणाम झाला आहे.

**संदर्भ**

१. गांधी एम. के., हिंद—स्वराज्य, परंधाम प्रकाशन, पवनार (वर्धा), आवृत्ती आठवी, २०१२.
२. दैनिक लोकसत्ता.
३. दैनिक सकाळ.